दि. 24/05/2023

लोकमत पा. न. २

# किल्ल्यात रील्ससाठी आग, तरुणावर गुन्हा

## पुरातत्त्व विभागाच्या तक्रारीवरून कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा/पारोळ :** वसई भुईकोट किल्ल्यातील येणाऱ्या काही उत्साही पर्यटक तरुणांकडून इन्स्टाग्रामवर व्हिडीओ बनविण्याच्या नादात थेट किल्ल्यातील चर्चमध्येच शिलालेखावर आग लावण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे वसई किल्ल्याची विटंबना झाल्याचा आरोप किल्ला संवर्धनप्रेमींनी केला. याबाबत पुरातत्त्व विभागाकडून आरोपी तरुणाविरोधात पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसई किल्ल्यातील फ्रान्सिस्कन चर्चमध्ये हासीम शेख या तरुणाने इन्स्टाग्राम रिल्ससाठी तेथील शिलालेखावर 'एस' आकारात ज्वलनशील रसायन टाकून आग लावली होती. शेखने याचा व्हिडीओ बनवून सोशल मीडियावरून व्हायरल केला होता. याची गंभीर दखल घेत, इतिहास अभ्यासक, तसेच किल्ले वसई मोहिमेचे श्रीदत्त राऊत यांनी पुरातत्त्व विभागाकडे ईमेलद्वारे तत्काळ तक्रार केली होती. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे अधिकारी कैलास नामदेवराव शिंदे यांनी वसई पोलिसांत आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला. दरम्यान, किल्ल्यात इतिहासकालीन शिलालेख, चर्च, तुरुंग, त्या काळातील पोर्तुगीजांचे कार्यालय तसेच अन्य ऐतिहासिक गोष्टी किल्ल्यात आजही पाहावयास मिळतात.



### सुरक्षारक्षक पैसे घेऊन देत होता परवानगी

वसई किल्ल्यात घडलेल्या एका रिल्स प्रकरणात गडप्रेमी तसेच इतिहास अभ्यासकांनी नाराजी व्यक्त केली असतानाच किल्ल्यात होणाऱ्या प्री-वेडिंग शूटिंग व रिल्स बनवण्यासाठी किल्ल्यातील सुरक्षारक्षकच पैसे घेऊन संबंधिताना संमती देत असल्याचा आरोप स्थानिक व गडप्रेमी नागरिकांनी केला आहे. याबाबत केंद्रीय पुरातत्त्व विभागाचे होत असलेले दुर्लक्ष आणि त्यामुळे वसईसारख्या ऐतिहासिक किल्ल्याची होत असलेली नासधूस इतिहास अभ्यासक आणि गडप्रेमी नागरिकांसाठी चिंतेची बाब ठरल्याचीच सध्या चर्चा आहे.

लोकमत पा. न. २

# सत्यनारायणाला गौतमी पाटील उद्या वसईत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पारोळ :** आपल्या नृत्याच्या ठेक्यावर अवघ्या महाराष्ट्राला फेर धरायला लावणारी प्रसिद्ध नृत्यांगना



गौतमी पाटील गुरुवार, दि. २५ मे रोजी वसईतील खार्डी गावात सत्यनारायणाच्या पूजेनिमित्त आयोजित कार्यक्रमासाठी येणार आहे. वसई तालुक्यातील गौतमी पाटील हिचा हा पहिला कार्यक्रम असल्याने मोठी गर्दी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे मांडवी पोलिसांना येथे बंदोबस्त तैनात करावा लागेल. खार्डी गावचे प्रभाकर पाटील यांच्याकडे असलेल्या कार्यक्रमानिमित्त गौतमी पाटील हजेरी लावणार आहे.

लोकमत पा. न. ५

# मोदी @ ९ पासून मित्र शिवसेना दूरच

## सामावून घेण्याबाबत अद्याप चर्चा नाही

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारला ९ वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल ३० मे पासून राज्यात सुरू होणाऱ्या मोदी @ ९ या अभियानापासून भाजपचा मित्र असलेली शिवसेना अद्याप दूरच आहे. त्यामुळे युतीचे सरकार असूनही केवळ भाजपच्या वतीनेच हे अभियान राबविले जात असल्याचे दिसत आहे.

भाजपच्या मंत्र्यांनी आपापल्या विभागामार्फत हे अभियान यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. मात्र त्या बाबत शिवसेनेच्या मंत्री कार्यालयांमध्ये कोणत्याही हालचाली दिसत नाहीत. आम्हाला तशा सूचना आलेल्या नाहीत असे दोन मंत्र्यांकडील पीए, पीएस यांनी सांगितले.

भाजपने हे अभियान यशस्वी करण्यासाठी चंग बांधला आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, अभियान समितीचे प्रमुख आ. प्रवीण दरेकर यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तयारीला वेग दिला आहे.

### समन्वय समिती अद्याप नाही

जाणकारांच्या मते शिंदे-फडणवीस सरकार स्थापन होऊन ११ महिने होत आले तरी दोन पक्षांच्या नेते/मंत्र्यांची समन्वय समिती अद्याप स्थापन झालेली नाही. अशी समिती असती तर मोदी @ ९ हे अभियान संयुक्तपणे राबविता आले असते.

> मोदी @ ९ हे अभियान राबविणे व त्यात शिवसेनेचा सहभाग याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.
>
> **- शंभूराज देसाई,**
> मंत्री, उत्पादन शुल्क

भाजपच्या ज्येष्ठ नेत्याने सांगितले की, देश पातळीवर हे अभियान भाजपच्याच माध्यमातून राबविले जाणार आहे. त्यामुळे मित्र पक्षाला त्यात सामावून घेण्यात आलेले नाही. मोदी सरकारचे महाराष्ट्रासाठीचे भरीव योगदान हीच अभियानाची थीम असेल. दोन्ही पक्षांकडील खात्यांमार्फतची कामे लोकांसमोर जाणार आहेत.

CamScanner

लोकमत पु.पा.नं. ३

दि. २८/०५/२०२३

# मीरा-भाईंदर महापालिकेला धारावी किल्ल्याची जागा होणार हस्तांतरित

## मुख्य सचिवांच्या बैठकीत निर्णय; सुशोभीकरणासाठी प्रयत्न

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेस चौक येथे धारावी किल्ल्याची जागा ठाणे जिल्हाधिकारी यांनी मीरा भाईंदर महापालिकेला हस्तांतरित करावी आणि पुरातत्व खात्याच्या परवानगीनुसार महापालिकेने किल्ल्याची देखभाल, सुरक्षा व संवर्धन करावे, असा निर्णय राज्याच्या मुख्य सचिवांकडे झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे.

पडझड झालेल्या धारावी किल्ल्याचे काही अवशेष शिल्लक आहेत. किल्ल्यावर नवीन अतिक्रमणे झाली आहेत. ह्या किल्ल्याकडे महापालिका, पोलिस, पुरातत्व खात्याने दुर्लक्ष केले होते. मात्र गडप्रेमींच्या पत्रानंतर महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी किल्ला संवर्धन व सुरक्षेसह सुशोभीकरणासाठी प्रयत्न सुरू केले. किल्ल्यासाठी अर्थसंकल्पात पालिकेने तरतूद केली. खासदार राजन विचारे व आमदार गीता जैन यांच्या पाठपुराव्याने शासनाकडून निधी मंजूर झाला आहे.

किल्ले परिसरातील मद्यपान बाबत राज्य मानवी हक्क आयोगाने दखल घेतली. या खंडपीठासमोर सुनावण्या झाल्या. महापालिकेकडून किल्ल्याचे पावित्र्य राखण्यासाठी पालिका सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करून प्रतिबंधक इशारा देणारे फलक लावले. २७ मार्च रोजी आयोगाने राज्याच्या मुख्य सचिवांनी बैठक घेऊन निर्णय घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार किल्ल्याचा काही भाग पालिकेकडे तर काही भाग जिल्हाधिकारी यांच्याकडे येत असल्याने या विभागाशी समन्वय करून निर्णय घेण्यासाठी राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन याचा निर्णय घेण्यात यावा, असे आदेश दिले होते.

### बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय



१ मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली ११ मे रोजी झालेल्या बैठकीत जागा ही जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारीत असल्याने त्यांनी ती महापालिकेकडे हस्तांतरित करावी.

२ जागा हस्तांतरित झाल्यानंतर पुरातत्व खात्याच्या परवानगीनुसार किल्ल्याचे जतन व सुशोभीकरण महापालिकेने करावे. किल्ला परिसरात कोणतीही नवीन बांधकाम करू नये. सीआरझेडच्या परवानगीसाठी पाठपुरावा करावा, असा निर्णय घेण्यात आला आहे.

३ तर किल्ला परिसरातील काही जागा ही कस्टम् वा मीठ विभागाची असल्याची शक्यता व्यक्त होऊ लागल्याने त्याची खात्री करून घेण्याचे काम पालिकेने सुरु केले आहे. त्यांची जागा असल्यास हस्तांतरण करण्यास विलंब लागण्याची शक्यता आहे.

# स्पर्धा परीक्षेच्या यशासाठी अथक परिश्रम आवश्यक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कल्याण :** स्पर्धा परीक्षेच्या यशासाठी अथक परिश्रम आवश्यक आहे, असे आवाहन कल्याण प्रांत अधिकारी अभिजित भांडे पाटील यांनी केले आहे.

कल्याण तालुक्यातील गोवेली जीवनदीप महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी दोनदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या शिबिराचे उद्घाटन प्रांत अधिकारी भांडे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रांत अधिकारी भांडे पाटील यांनी स्वतः महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा कशी यशस्वीपणे दिली, याविषयीची माहिती दिली. यावेळी कल्याणचे तहसीलदार जयराज देशमुख यांनी प्रास्ताविक करून कार्यशाळेचा हेतू स्पष्ट केला.

मुरबाडचे तहसीलदार संदीप आवारी यांनी खेळातील राखीव जागांचा फायदा स्पर्धा परीक्षेकरीता होऊ शकतो, याविषयीची माहिती दिली. जीवनदीप महाविद्यालयाचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचा लाभ २०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी घेतला. यावेळी प्रा. हरेंद्र सोष्टे, नरेश टेंभे उपस्थित होते.

लोकमत पा.नं. ८

# कुस्तीपटू विनेश फोगाट आहे मंथरा

## भाजप खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांचे वादग्रस्त उद्गार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कुस्तीपटू विनेश फोगाट या मंथरा आहेत. रामायणामध्ये मंथरा, कैकयी या ज्याप्रमाणे वागल्या, त्याचप्रमाणे विनेश या मंथरा बनून माझ्याशी वागत आहेत, अशी टीका भाजपचे खासदार ब्रिजभूषण शरण सिंह यांनी केली आहे.

ते म्हणाले की, मंथरा, कैकयी या वाईट वागल्या. त्यामुळे सारे सत्य जगासमोर आले होते. विनेश फोगाट यांनी केलेल्या आरोपांमागची वस्तुस्थिती जगासमोर लवकरच येईल. माझ्याविरोधात कारस्थान रचण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. यापूर्वीही खेळाडूंनी पदके परत करण्याचा निर्णय जाहीर केल्यावर सिंह यांनी पदके कशाला परत करता, बक्षिसाची रक्कम परत करा, अशी खोचक टीका केली होती.



**कुस्तीगिरांनी काढला मोर्चा :** ब्रिजभूषण शरण सिंह यांना अटक करावी ही मागणी मान्य होत नसल्याच्या निषेधार्थ कुस्तीगिरांनी मंगळवारी इंडिया गेटपर्यंत एक मोर्चा काढला. त्यात कुस्तीगीर व त्यांचे हजारो समर्थक हातात तिरंगा ध्वज घेऊन सामील झाले होते. आमच्या मोर्चामध्ये जनतेने सामील होऊ नये म्हणून पोलिसांनी प्रयत्न केले, असा आरोप कुस्तीगिरांनी केला.

# इम्रान खान यांना ८ जूनपर्यंत जामीन मंजूर

**इस्लामाबाद :** येथील न्यायालय संकुलामध्ये मार्च महिन्यात झालेल्या हिंसाचाराबद्दल दाखल केलेल्या आठ गुन्ह्यांमध्ये पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना न्यायालयाने ८ जूनपर्यंत जामीन मंजूर केला आहे.

तोषखाना व्यवहारांमध्ये झालेल्या आर्थिक घोटाळ्याच्या खटल्यासाठी इम्रान खान १८ मार्च रोजी न्यायालयात हजर झाले होते. त्यावेळी न्यायालयाच्या संकुलात त्यांच्या पाकिस्तान तेहरीक-ए-इन्साफ पक्षाचे कार्यकर्ते व पोलिसांमध्ये चकमक उडाली होती. त्यात २५ पोलिस जखमी झाले होते. या हिंसाचारप्रकरणी इस्लामाबाद येथील विविध पोलिस ठाण्यांत इम्रान खान यांच्या विरोधात आठ गुन्हे दाखल करण्यात आले होते.

CS CamScanner

दि. २८/०५/२०२३

लोकमत पु.पा. नं. १

# तंत्रज्ञ नसल्याने मॅमोग्राफी यंत्र सात महिने धूळखात


लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : नगरसेवकपदाचा कार्यकाळ संपता-संपता श्रेय लाटण्यासाठी मीरा रोडच्या भारतरत्न इंदिरा गांधी रुग्णालयात महिलांसाठी खरेदी केलेले ४४ लाखांचे मॅमोग्राफी यंत्र तंत्रज्ञच नसल्याने सात महिने धूळखात पडून आहे.

श्रेय घ्यायचे म्हणून घाईगडबडीत आवश्यक मंजुरी व पूर्वतयारी न करताच सुविधा सुरू केली जाते. मात्र, त्यानंतर ती सुरू आहे की नाही? हेही पाहिले जात नाही. महिलांना स्तन कर्करोगाची लागण होण्याचे प्रमाण वाढले आहे. या महत्त्वाच्या तपासणीसाठी २०२२ मध्ये मॅमोग्राफी यंत्र महिला बालकल्याण समितीने ४४ लाखांना खरेदी केले. ते मीरा रोडच्या भारतरत्न इंदिरा गांधी महापालिका रुग्णालयात बसवले व त्याचे लोकार्पणही १२ ऑगस्ट २०२२ रोजी केले. काही दिवसांनीच नगरसेवकांचा कार्यकाळ संपणार असल्याने सुविधेचे श्रेय घेण्यासाठी

## तपासणीसाठी भुर्दंड

लाखो रुपयांचे मॅमोग्राफी यंत्र असूनही महिलांना तपासणीसाठी खासगी लॅब वा खासगी रुग्णालयात जास्त पैसे देऊन भुर्दंड सहन करावा लागत आहे.



हा खटाटोप तत्कालीन पालिका पदाधिकारी, नगरसेविकांनी केल्याची सोशल मीडिया व अन्य माध्यमातून चर्चा सुरू होती. रीतसर मंजुरी नसताना तंत्रज्ञ नेमण्यात आला. मात्र, पालिकेची मंजुरी नसल्याने तात्पुरत्या स्वरूपात नेमलेल्या तंत्रज्ञास काही महिने पगारच न मिळाल्याने तो काम सोडून गेला. त्यामुळे गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरअखेरपासून तंत्रज्ञ नसल्याने हे यंत्र धूळखात पडले आहे.

म.टा. पु.पा. नं. १

# 'क्लस्टर' योजनेसाठी पालिकेत स्वतंत्र कक्ष

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरमधील जुन्या इमारतींचा पुनर्विकास व झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने क्लस्टर (समूह विकास योजना) योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेसाठी पालिकेकडून स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला आहे. योजनेच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्यासाठी मिरा रोडच्या महापालिका इमारतीत या कक्षाची उभारणी करण्यात आली आहे.

मिरा-भाईंदर पालिका हद्दीतील अनेक जुन्या इमारतींचा पुनर्विकास रखडला आहे. पूर्वी या इमारती उभारताना अतिरिक्त चटई क्षेत्रफळाचा वापर करण्यात आल्याने त्यांच्या पुनर्विकासात आता मोठा अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे जुन्या इमारतींचा पुनर्विकास तसेच झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टिकोनातून ठाण्याच्या धर्तीवर क्लस्टर योजना राबवण्याचा निर्णय पालिका प्रशासनाने घेतला आहे. ही योजना २४ ठिकाणी राबवण्याचे आराखडे सर्वेक्षणाअंती निश्चित करण्यात आले आहे. त्यावर राज्य सरकारकडून शिक्कामोर्तबही करण्यात आले आहे.

आता त्यासाठी योग्य नियोजन करत, योजनेची प्रत्यक्षात लवकर अंमलबजावणी करावी, यासाठी पालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्या आदेशानुसार क्लस्टर योजना प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. हा कक्ष मिरा रोड येथील बुद्धविहार इमारतीच्या पहिल्या मजल्यावर उभारण्यात आला आहे. येथे क्लस्टर योजनेसंदर्भात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना बसण्याची तसेच योजनेसंबंधी सर्वेक्षण केलेली माहिती साठवून ठेवण्याची इतर व्यवस्थाही करण्यात आली आहे.

## मिरा-भाईंदरमध्ये निर्णय



### नागरिकांमध्ये संभ्रम

मात्र क्लस्टर योजनेसंदर्भात मिरा-भाईंदरवासियांमध्ये संभ्रम आहे. काही भागात या योजनेला विरोधही होत आहे. या संदर्भातील शंकांचे निराकरण करण्यासाठी येत्या काळात जनजागृती करण्याचा विचार प्रशासनाकडून केला जात असल्याचे पालिका उपायुक्त मारुती गायकवाड यांनी सांगितले.

म.टा. पा. नं. ५

# ठाण्यातील ५३५ महिला बेपत्ताच

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

राज्यात मुलींचे गायब होण्याचे प्रमाण ही चिंतेची बाब आहे. अशा महिला व मुलींचा शोध लागला नाही, तर त्या मानवी तस्करीला बळी पडण्याची भीती आहे, असे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी मंगळवारी येथे सांगितले. ठाणे जिल्ह्यात २०२२मध्ये २४६२ महिला बेपत्ता असल्याची नोंद झाली असून १,९७२ महिलांचा शोध लागला. परंतु अजूनही ५३५ महिलांचा शोध लागलेला नाही. पहिल्या तीन-चार महिन्यांत महिलांचा शोध न लागल्यास कालांतराने त्या मानवी तस्करीला बळी पडतात.

## रूपाली चाकणकर यांची माहिती

आत्तापर्यंत २४ जिल्ह्यांचे दौरे केले, परंतु सर्वाधिक तक्रारी ठाणे जिल्ह्यातील आहेत, अशी माहितीही त्यांनी दिली.

'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत ठाणे जिल्ह्यात मंगळवारी झालेल्या जनसुनावणीमध्ये जिल्ह्यातून १७४ तक्रारी दाखल झाल्या असून या सर्वांच्या तक्रारींवर तातडीने सुनावणी घेऊन संबंधित विभागांना त्याचे निराकरण करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण कमी असले तरी अनेक ठिकाणी लपूनछपून, जन्मतारीख चुकीची दाखवून बालविवाह होत आहेत. असे प्रकार रोखण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न होणे आवश्यक आहे. जिल्ह्यात 'इंटर्नल कम्प्लेन्टस कमिटी' स्थापन होणे गरजेचे आहे. परंतु ठाण्यात ते दिसून येत नाही. यासाठी ३ आठवड्यांचा कालावधी देण्यात आला आहे. १७४ तक्रारींमध्ये ११६ तक्रारी या वैवाहिक/कौटुंबिक समस्यासंदर्भातील होत्या. तर १८ तक्रारी सामाजिक समस्येच्या, ९ तक्रारी मालमत्ताविषयक, ५ तक्रारी या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या त्रासाच्या आणि इतर विषयाच्या २६ तक्रारी दाखल झाल्या होत्या.

म.टा. पु.पा.नं. १

## आणखी पाच साहाय्यक आयुक्त

मिरा-भाईंदर : मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयात पाच नवीन साहाय्यक पोलिस आयुक्तांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. राज्य सरकारच्या गृह विभागाने राज्यभरातील साहाय्यक पो. आयुक्त पदावर कार्यरत अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश सोमवारी जारी केले. यामध्ये मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयात पाच नव्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यात ठाणे पोलिस दलातील उमेश माने (पाटील), संभाजीनगर पोलिस दलातील विजयकुमार मराठे, पुणे शहर पोलिस दलात कार्यरत बजरंग देसाई या अधिकाऱ्यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त पोलिस निरीक्षक महेश तरडे व भास्कर पुतळे यांना साहाय्यक आयुक्त पदी पदोन्नती देण्यात आली आहे.

CamScanner

म.टा.-पु.पा.न. 9 दि. 28/05/2023

# ५३ इमारती अतिधोकादायक

## वसई-विरार महापालिकेकडून यादी जाहीर

■ यंदा यादीत ३७ इमारतींची भर

■ २९७ इमारतींवर आतापर्यंत कारवाई

**म. टा. वृत्तसेवा, वसई**



### कारवाईचे आव्हान

वसई-विरार महापालिका हद्दीत सर्वेक्षण केले असता ५३ इमारती अतिधोकादायक असल्याचे समोर आले आहे. आतापर्यंत एकूण ३६१ इमारती धोकादायक असल्याचे समोर आले असून त्यापैकी २९७ इमारतींवर कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे ५३ इमारतींवर निष्कासनाची कारवाई यापुढे करण्याचे नियोजन आहे. यापैकी काही इमारतींवर कारवाईस न्यायालयाची स्थगिती आहे. तर काही इमारती या भर वस्तीमध्ये असल्याने आजूबाजूच्या नागरिकांचा इमारती पाडण्यास विरोध आहे. काही इमारतींमध्ये अजूनही रहिवासी वास्तव्य करत आहेत. या परिस्थितीत मध्यम मार्ग काढण्याचे काम सुरू आहे. तसेच स्थगिती उठवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र मार्ग मोकळ्या असलेल्या इमारती जमीनदोस्त करण्याचे सुरू आहे, असे वसई-विरार महापालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले.

वसई-विरार महापालिकेच्या नऊ प्रभागांमध्ये तब्बल ३६१ इमारती अतिधोकादायक असल्याचे आतापर्यंत समोर आले होते. त्यापैकी २९७ इमारतींवर महापालिकेने कारवाई केली असून ५३ अतिधोकादायक इमारती आता पालिका हद्दीत आहेत. वसई-विरार महापालिकेने शहरातील या अतिधोकादायक इमारतींची यादी नुकतीच जाहीर केली असून त्यावर कारवाईदेखील सुरू केली आहे.

वसई-विरार महापालिका क्षेत्रात दिवसेंदिवस अतिधोकादायक इमारतींची संख्या वाढत आहे. अतिधोकादायक इमारतींमुळे दुर्घटनांना सामोरे जावे लागू नये, म्हणून दरवर्षी अशा इमारतींचे सर्वेक्षण करून त्यानंतर त्यांची यादी तयार केली जाते. मुख्यतः पावसाळ्यात अशा इमारतींना अधिक धोका असतो. तीन वर्षांपूर्वी पावसाळ्यात नालासोपारा पूर्वेकडील ११ वर्षे जुनी 'साफल्य' ही धोकादायक इमारत कोसळली होती, तर दोन वर्षांपूर्वी मे महिन्यामध्ये विरार, नारंगी येथील नाना अपार्टमेंट या धोकादायक इमारतीचा सज्जा कोसळला होता. मागील वर्षी विरार येथील एका इमारतीचे छत कोसळले होते. त्यामुळे येत्या पावसाळ्यात इमारती दुर्घटनांना सामोरे जावे लागू नये, यासाठी वसई-विरार महापालिका क्षेत्रातील धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींची यादी लवकरात लवकर जाहीर करावी, अशी मागणी समोर आली होती.

या पार्श्वभूमीवर, ३० वर्षे आणि त्याहून जुन्या इमारतींचे सर्वेक्षण करण्याचे आदेश पालिकेच्या अनधिकृत बांधकाम विभागाने सर्व प्रभाग समित्यांना दिले होते. या सर्वेक्षणानंतर पालिकेने धोकादायक आणि अतिधोकादायक इमारतींची संख्या नुकतीच जाहीर केली आहे. शहरात सध्या ५३ इमारती अतिधोकादायक आहेत. पालिकेच्या नऊ प्रभागांमध्ये पालिका स्थापनेपासून मागील वर्षापर्यंत एकूण ३२४ इमारती अतिधोकादायक घोषित करण्यात आल्या होत्या. पालिकेने त्यांच्यावर कारवाईही केली होती. त्यानंतर या इमारतींमध्ये भर पडली. यंदा केलेल्या सर्वेक्षणांची, या इमारतींच्या संख्येत ३७ने भर पडल्याचे समोर आले. त्यामुळे शहरातील अतिधोकादायक इमारतींचा आकडा ३६१वर पोहोचला आहे. यापैकी २९७ इमारतींवर महापालिकेने याआधी कारवाई केली आहे. त्यामुळे एकूण ५३ इमारती सध्या धोकादायक असल्याचे पालिकेने सांगितले.

या ५३ इमारतींपैकी काही इमारती जमीनदोस्त करण्यास पालिकेने सुरुवात केली आहे. यादी जाहीर करताच पालिकेने रिकाम्या न झालेल्या इमारतींना नोटिसा बजावल्या होत्या. त्यामुळे या इमारती जमीनदोस्त करण्याचे काम पावसाळ्याआधी वेगाने सुरू आहे. या कारवाईचा अहवाल प्रभाग समितीच्या साहाय्यक आयुक्तांकडून नियमित घेण्यात येत आहे. कारवाईसाठी पोलिस बंदोबस्त आणि एमएसएफची मदत घेतली जात असल्याचे पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी सांगितले.

लोकसत्ता पा.न. 9

# सनसिटी दफनभूमीचे काम थांबवले

## वसई-विरार महापालिकेवर १ जून रोजी धडक मोर्चा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार महापालिकेने 'सनसिटी' येथील सर्वधर्मीय दफनभूमीचे काम थांबविले असून, त्याविरोधात येत्या १ जून रोजी महापालिका मुख्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

शहरातील मुस्लिम धर्मीयांसह प्रोटेस्टंट ख्रिस्ती धर्मियांसाठी दफनभूमी नव्हती. त्यासाठी महापालिकेने सर्वधर्मीयांच्या दफनभूमीसाठी वसई पश्चिमेतील 'सनसिटी' येथे ११ एकर जागा आरक्षित केली होती. तसेच २०१३ मध्ये या जागेवर मातीचा भराव करून भिंत बांधून दफनभूमीचे काम सुरू केले होते. एकूण साडेसहा एकर जागेत असलेल्या या दफनभूमीत मुस्लिम धर्मीयांसाठी अडीच एकर, ख्रिस्ती धर्मीयांसाठी तीन एकर, हिंदूंसाठी १५ गुंठे तर आणि बेवारस मृतदेह पुरण्यासाठी जागा ठेवण्यात आली आहे. मात्र, या दफनभूमीला स्थानिक नागरिकांनी जोरदार विरोध केला होता.

### 'पालिकेला जाब विचारणार'

उच्च न्यायालयाने कोणतीही स्थगिती दिलेली नसतानाही पालिकेने दफनभूमीचे काम थांबवले आहे. त्यामुळे १ जानेवारी रोजी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागातर्फे १ जून रोजी महापालिकेच्या मुख्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येणार आहे. यावेळी पर्यावरण आणि सोयी सुविधा देण्यास अपयशी ठरलेल्या पालिकेला जाब विचारला जाणार आहे. पालिकेला सर्व परवानग्या मिळालेल्या आहेत. दफनभूमीच्या कामाला स्थगिती देण्यात आलेली नाही, मग काम काम का थांबवले, असा सवाल काँग्रेसचे समीर वर्तक यांनी केला आहे.

दरम्यान, पालिकेने केलेले दफनभूमीचे बांधकाम सागरी किनारा नियंत्रण क्षेत्राचे उल्लंघन करणारे असल्याचा आरोप करत हरित लवादाकडे तक्रार करण्यात आली होती. त्यामुळे हरित लवादाने बांधकाम थांबवून भिंत पाडण्याचे आदेश दिले होते. तेव्हापासून या दफनभूमीचे काम रखडले होते. त्यानंतर पुन्हा पालिकेने या कामासाठी परवानगी मिळवण्याचे काम सुरू केले होते. पालिकेने महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण आणि पाणथळ विभागाच्या परवानग्या मिळवल्या आणि काम सुरू केले.

दरम्यान, 'वनशक्ती' या पर्यावरणवादी संस्थेने पाणथळ क्षेत्राच्या संरक्षणाविषयी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर १४ ऑक्टोबर २०१३ रोजी उच्च न्यायालयाने ही जागा पाणथळ असून, त्यावर परवानगीशिवाय बांधकाम करता येणार नाही, असे आदेश दिले होते. पाणथळ जागेत बांधकाम करायचे असल्यास उच्च न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे. या मुद्द्यावरून न्यायालयात विरोध करण्यात आला आहे. त्यामुळे पालिकेने दफनभूमीचे काम थांबवले आहे. ऑगस्टमध्ये पुढील सुनावणी आहे.


### सनसिटी दफनभूमीचे काम थांबवले

**वसई :** वसई-विरार महापालिकेने 'सनसिटी' येथील सर्वधर्मीय दफनभूमीचे काम थांबविले असून, त्याविरोधात येत्या १ जून रोजी महापालिका मुख्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे.

वृत्त...४

CamScanner

लोकसत्ता पु. पा. न. १, ८ दि. २८/०५/२०२३



# अर्थव्यवस्थेत भारताचे स्थान भक्कम

## ऑस्ट्रेलियामध्ये पंतप्रधान मोदी यांचा विश्वास; भारतीय समुदायाच्या कार्यक्रमात मैत्रीची ग्वाही

**पीटीआय, सिडनी**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मते जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये भारताचे स्थान भक्कम असून जागतिक बँकेच्या अहवालानुसार प्रतिकूल परिस्थितीचा सामना करू शकणारा एखादा देश असेल तर तो भारतच आहे, असा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केला. ऑस्ट्रेलियाच्या दोन दिवसीय दौऱ्यामध्ये त्यांनी सिडनीमध्ये भारतीय समुदायाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात भारत-ऑस्ट्रेलिया मैत्रीची ग्वाही दिली.

> दोन्ही देशांमधील भौगोलिक अंतर जास्त असले तरी हिंद महासागराने आपण जोडले गेलेलो आहोत. आपली जीवनशैली कितीही वेगळी असली तरी योग, क्रिकेट, टेनिस आणि चित्रपट हे दोन्ही देशांना एकमेकांशी जोडणारे दुवे आहेत.
>
> - नरेंद्र मोदी, पंतप्रधान

> भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे 'बॉस' आहेत. भारतीय वंशाच्या नागरिकांमुळे ऑस्ट्रेलिया अधिक समृद्ध झाला आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील द्विपक्षीय संबंध आणखी दृढ व्हावेत.
>
> - अँथनी अल्बानीज, पंतप्रधान, ऑस्ट्रेलिया

सिडनीमधील 'कुडोस बँक अरेना' स्टेडियममध्ये झालेल्या कार्यक्रमात ऑस्ट्रेलियातील भारतीय वंशाचे सुमारे २१ हजार नागरिक सहभागी झाले होते. पंतप्रधान मोदी आणि (पान ८ वर)

# अर्थव्यवस्थेत भारताचे स्थान भक्कम

(पान १ वरून) ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांनी उपस्थितांना संबोधित केले. परस्पर आदर आणि विश्वास हा भारत-ऑस्ट्रेलिया संबंधांचा सर्वांत मजबूत आणि मोठा पाया असल्याचे पंतप्रधान मोदी यावेळी म्हणाले. सर्वांत आव्हानात्मक काळामध्येही भारताने विक्रमी निर्यात केली. भारताकडे क्षमतेचा किंवा साधनसामग्रींचा अभाव नाही, असे सांगत देशाच्या स्थिर अर्थव्यवस्थेची ग्वाही पंतप्रधानांनी दिली. ब्रिस्बेन येथे भारताचा वाणिज्य दूतावास सुरू करण्याची घोषणा करून मोदी यांनी भारतीय वंशाच्या नागरिकांच्या अन्य प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

### तीन सी... तीन डी... तीन ई...

आपली लघुरूपांची आवड कायम राखत मोदी यांनी भारत आणि ऑस्ट्रेलिया संबंध 'तीन सी', 'तीन डी' आणि 'तीन ई' यात गुंफले. कॉमनवेल्थ, क्रिकेट आणि करी, डेमोक्रसी, डायस्पोरा आणि दोस्ती, एनर्जी, इकॉनॉमी आणि एज्युकेशन या समान धाग्यांमुळे दोन्ही देशांचे संबंध अधिक दृढ असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ऑस्ट्रेलियाचा फिरकीपटू शेन वॉर्न याच्या अकाली निधनामुळे भारतातील त्याचे लाखो चाहते दुःखी झाले होते, याची आठवणही मोदी यांनी करून दिली.

या कार्यक्रमात अल्बानीज यांनी मोदी यांचा उल्लेख 'बॉस' असा केला. मोदी जिथे जातील, तिथे त्यांचे रॉक स्टारसारखे स्वागत होते, असे ते म्हणाले. अमेरिकेचा गायक-संगीतकार ब्रुस स्प्रिंगस्टीन याच्या कुडोस बँक अरेनामध्ये २०१७मध्ये झालेल्या कार्यक्रमाची आठवण काढत तशीच गर्दी आताही झाल्याचे अल्बानीज म्हणाले. स्प्रिंगस्टीन हा चाहत्यांमध्ये 'बॉस' या नावाने प्रसिद्ध आहे. त्याच्या संदर्भात अल्बानीज यांनी मोदींना ही उपमा दिली. या कार्यक्रमात भारतीय आणि ऑस्ट्रेलियाच्या संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या कार्यक्रमांचे सादरीकरणही झाले.

### सिडनीमध्ये 'लिटल इंडिया'

पंतप्रधान मोदी आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अल्बानीज यांच्या उपस्थितीत पश्चिम सिडनीमधील 'हॅरिस पार्क' या भागाचे 'लिटल इंडिया' असे नामांतर करण्यात आले. हॅरिस पार्क हा सिडनीच्या उपनगराचा भाग तेथे होळी, दिवाळीसारखे भारतीय सण आणि ऑस्ट्रेलियाचे राष्ट्रीय दिवस उत्साहाने साजरे केले जातात.

CamScanner

दि. २४/०५/२०२३

लोकसत्ता पु. पा. न. १

## सूत्रधाराविरोधात गुन्हा नाही

**वसई :** वसई-विरार महापालिकेतील कर घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार अरुण जानी याच्याविरुद्ध अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे त्याला वाचविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. दरम्यान, महापालिकेच्या लेखापरीक्षण विभागाकडून चौकशी सुरू असून, ती पूर्ण झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यासाठी तक्रार देण्यात येईल, असे पालिकेने सांगितले. वृत्त...४

# कर घोटाळ्यातील सूत्रधाराविरोधात अद्याप गुन्हा नाही

## पालिका चौकशीनंतर तक्रार नोंदवणार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार महापालिकेतील कर घोटाळ्यातील मुख्य सूत्रधार अरुण जानी याच्याविरुद्ध अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे त्याला वाचविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. दरम्यान, महापालिकेच्या लेखापरीक्षण विभागाकडून चौकशी सुरू असून, ती पूर्ण झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यासाठी तक्रार देण्यात येईल, असे पालिकेने सांगितले.

प्रभाग समिती 'सी' येथील करअधीक्षक अरुण जानी हा नागरिकांकडून जमा झालेली कराची रक्कम बँकेत न भरता त्याचा अपहार करत होता. नागरिकांनी कर भरल्यानंतर पावती दिली जाते आणि रोखपालामार्फत ती रक्कम बँकेत जमा केली जाते. मात्र, प्रभाग समिती 'सी'मध्ये जानी आणि रोखपाल नियती कुडू, प्रभारी साहाय्यक आयुक्त गणेश पाटील हे त्रिकुट संगनमताने हा अपहार करत होते. नागरिकांची रक्कम बँकेत जमा न करता केवळ कागदोपत्री पैसे जमा झाल्याची नोंद दाखवत होते.

१८ एप्रिल ते १६ मे २०२३ दरम्यान ७२ लाख ६८ हजार ८९९ लाखांचा कर जमा झाला होता, परंतु जानी याने त्यातील ४६ लाख ४६ हजार २३९ रुपयांचा बँकेत भरणा केलेला नव्हता. हे पैसे परस्पर व्याज देण्यासाठी वापरत असल्याचा आरोप आहे. त्यामुळे पालिकेने त्याला सेवेतून निलंबित केले आहे. तर, कुडू आणि पाटील यांची विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

जानी हा पालिकेची कायम सेवेतील जुना कर्मचारी आहे. कराची रक्कम व्याजाने देऊन त्याने मोठा आर्थिक फायदा मिळवला आहे. त्याने जमविलेल्या मालमत्तेची चौकशी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून तसेच या संपूर्ण प्रकरणाची चौकशी विशेष तपास पथक (एसआयडी) नेमून करावी, अशी मागणी तक्रारदार चरण भट यांनी केली आहे. भ्रष्टाचाराचे हे प्रकरण उघडकीस येऊनही अद्याप पालिकेने त्याच्याविरोधात पोलिसांत तक्रार दिली नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. जानी याला वाचविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे.

याप्रकरणी लेखा परीक्षण विभागाकडून चौकशी सुरू आहे. ती पूर्ण झाल्यानंतर पोलिसांत तक्रार देण्यात येईल, अशी माहिती उपायुक्त समीर भूमकर यांनी दिली.

लोकसत्ता पु. पा. न. ४

## भाईंदरमध्ये आज समुपदेशन मेळावा

**भाईंदर :** ठाण्याच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतर्फे संपूर्ण राज्यात 'छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करिअर शिबिर' या समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. त्यानुसार बुधवार, २४ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी १ दरम्यान हा मेळावा भाईंदर पश्चिम येथील रीना मेहता कॉलेजमध्ये होणार आहे. या मेळाव्यात इयत्ता दहावी व बारावी नंतरचे शिक्षण व अभ्यासक्रम, महाविद्यालयीन प्रवेश प्रक्रिया, कलमापन चाचणी, शिष्यवृत्ती योजना आदीबाबत विद्यार्थ्यांना मोफत मार्गदर्शन केले जाणार आहे.

लोकसत्ता पु. पा. न. १

# प्रत्येक प्रभागामध्ये आपत्ती नियंत्रण कक्ष

## पावसाळ्यात त्वरित मदत शक्य

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** पावसाळ्यातील विविध समस्यांचे निवारण करण्यासाठी वसई-विरार महापालिकेने यंदा विशेष उपाय योजना सुरू केल्या आहेत. त्याचा एक भाग म्हणून मध्यवर्ती आपत्ती व्यवस्थापन कक्षाबरोबर सर्व नऊ प्रभागांत विभागीय आपत्ती नियंत्रण कक्ष सुरू केला जाणार आहे.

दरवर्षी पावसाळ्यात विविध समस्या निर्माण होतात. त्यामध्ये पाणी साचणे, पूरपरिस्थिती, दरड कोसळण्याच्या घटना घडतात. अशा वेळी नागरिकांना या संकटातून मदत देण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आला आहे. वसई-विरार महापालिकेचा मुख्य आपत्ती नियंत्रण कक्ष दिवाणमान येथील बहुउद्देशीय इमारतीत आहे. या कक्षातून २४ तास नागरिकांना सेवा पुरवली जाते. मदतीसाठी लागणारे सर्व अत्याधुनिक साहित्य आणि मनुष्यबळ या कक्षातून पुरविण्यात येते. मात्र, हा कक्ष अधिक प्रभावी करण्यासाठी यंदा प्रत्येक प्रभागात विभागीय आपत्ती नियंत्रण कक्ष सुरू केला जाणार आहे.

पालिकेचे नवघर माणिकपूर, वसई, वालीव, पेल्हार, आचोळे, बोळींज, नालासोपारा (प), चंदनसार, असे नऊ आपत्ती नियंत्रण कक्ष आहेत. या सर्व प्रभागांमध्ये हा कक्ष कार्यरत राहणार आहे. ज्यामुळे नागरिकांना वेळेवर मदत मिळू शकणार आहे. या कक्षात पाणी उपसा करण्याचे यंत्र, बचाव कार्याचे साहित्य, जनरेटर तसेच औषधसाठा आणि मनुष्यबळ तैनात केला जाणार आहे. त्यांचे हेल्पलाइन क्रमांक लवकरच जाहीर केले जाणार आहे. पावसाळ्यात कोणत्याही संकटात वेळेवर मदत मिळावी, यासाठी विभागीय आपत्ती नियंत्रण कक्ष सुरू केले जाणार असल्याची माहिती पालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी दिलीप पालव यांनी दिली.

CamScanner

लोकसत्ता पु.पा.नं. ४

दि. २४/०५/२०२३

पुढारी पा.नं. १



## स्वरा पाटीलकडून हिमालयातील सारपास शिखर सर

**वसई :** वसईतील नऊ वर्षांच्या स्वरा पाटील हिने १३ हजार ८५० फुटांपेक्षा उंचीवरील हिमालयातील सारपास शिखर सर करण्याची कामगिरी केली आहे.

स्वरा ही वसईच्या उमेळमान गावात राहत असून, कार्मेलाईट कॉन्व्हेंट हायस्कूलची विद्यार्थिनी आहे. स्वराने १२ मे रोजी तिच्या प्रवासाला सुरुवात केली. १७ मेपर्यंत अर्थात सहा दिवसांत तिने पाच गिर्यारोहण मोहिमा केल्या. यातील शेवटचे तीन दिवस १४ ते १६ अंश तापमान असतानाही स्वराने मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण केली.

१२ मे रोजी पहिल्या दिवशी कसोल बेस कॅम्प पाच हजार ३०० फूट, १३ मे कसोल बेस कॅम्प ते ग्रहान सात हजार ८०० फूट, ग्रहान ते मीनताच ११ हजार १०० फूट, मीनताच ते नगारू १२ हजार ४५० फूट, नगारू ते बिसकरी व्हाया सारपास १३ हजार ८५० फूट इतर अंतर यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. कमी वयातच तिने हे शिखर सर केल्याने सर्वत्र तिचे कौतुक होत आहे. तिने नुकतेच महाराष्ट्रातील सर्वोच्च कळसूबाई शिखरावर यशस्वी गिर्यारोहण मोहीम पूर्ण केली होती.

# 'मविआ'ला जागावाटपाची डोकेदुखी

### सक्षम उमेदवार ठरणार निकष; 'वंचित' शिवसेनेच्या कोट्यात

**मुंबई : दिलीप सपाटे**

महाविकास आघाडीत जागावाटपाला तोंड फुटताच मतभेद चव्हाट्यावर येऊ लागले आहेत. लोकसभेच्या ४८ पैकी जास्तीत जास्त जागा मिळविण्यासाठी आघाडीतील तिन्ही पक्षांमध्ये रस्सीखेच सुरू झाली आहे. हे मतभेद टाळण्यासाठी ज्या पक्षाकडे सक्षम उमेदवार आणि पक्षाची ताकद असेल, त्या पक्षाला जागा सोडण्यावर चर्चा सुरू झाली आहे.

महाविकास आघाडीत मोठा भाऊ कोण? आणि कोणाची ताकद किती? यावर दावे-प्रतिदावे सुरू झाले आहेत. आघाडीत सध्या जागावाटपासाठी कोणताही फॉर्म्युला ठरलेला नाही. मात्र, ज्या पक्षाकडे सक्षम उमेदवार असेल तेथे निवडून येण्याच्या निकषावर जागावाटप करावे, /...२

## 'मविआ'ला जागावाटपाची डोकेदुखी

असा फॉर्म्युला शरद पवारांच्या उपस्थितीत त्यांच्या 'सिल्व्हर ओक' या निवासस्थानी झालेल्या बैठकीत चर्चेला आला आहे. प्रामुख्याने पहिल्या बोलणीत लोकसभेच्या दहा ते बारा मतदारसंघांत पेच निर्माण झाला आहे. उत्तर महाराष्ट्रात धुळे, नंदुरबार या दोन्ही जागा काँग्रेसला देण्यावर एकमत आहे; तर जळगाव मतदारसंघावर राष्ट्रवादीचा दावा आहे. नाशिक लोकसभा गेल्यावेळी शिवसेनेने जिंकली असली, तरी खासदार हेमंत गोडसे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील झाले आहेत. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस या मतदारसंघावर दावा करण्याची शक्यता आहे. तेथे समीर भुजबळ किंवा छगन भुजबळ यांची उमेदवारी पुढे केली जाऊ शकते.

**काँग्रेसचा विदर्भावर भर**

काँग्रेसचा भर जादातर विदर्भावर आहे. विदर्भात रामटेक मतदारसंघ शिवसेनेकडे असला, तरी हा मतदारसंघ काँग्रेसला हवा आहे. अकोला लोकसभा मतदारसंघावर वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर यांनी आधीच उद्धव ठाकरे यांच्याकडे दावा सांगितला आहे. मात्र, काँग्रेसने या मतदारसंघावरही दावा केला आहे. 'वंचित'ने अकोला, सोलापूरसह किमान चार मतदारसंघांवर दावा केला आहे. त्यावर या जागा उद्धव ठाकरे यांनी आपल्या कोट्यातून 'वंचित'ला द्याव्यात, अशी भूमिका काँग्रेस-राष्ट्रवादीने घेतल्याचे समजते.

यवतमाळ-वाशिमच्या खासदार भावना गवळी तसेच संजय राठोड हे दोन्ही प्रमुख नेते शिंदे गटात गेल्याने हा मतदारसंघदेखील काँग्रेसला हवा आहे. तसेच बुलडाणा मतदारसंघात खासदार प्रतापराव जाधव यांच्यासह बुलडाण्याचे आमदार संजय गायकवाड, मेहेकरचे आमदार संजय रायमूलकर हेदेखील एकनाथ शिंदेंसोबत गेल्याने शिवसेनेकडे सक्षम उमेदवाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. तेथे राष्ट्रवादी काँग्रेसकडे राजेंद्र शिंगणे यांच्यासारखा उमेदवार असल्याने त्यांच्या नावाचा विचार व्हावा, असा राष्ट्रवादीचा प्रयत्न आहे.

**हातकणंगले शेट्टींना, कोल्हापूर हवा काँग्रेसला**

कोल्हापूर संजय मंडलिक आणि हातकणंगले मतदारसंघाचे खासदार धैर्यशील माने हे दोघेही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत सामील झाले आहेत. त्यांच्या जागी शिवसेनेला पर्यायी उमेदवार द्यावे लागणार आहेत; पण आघाडीत झालेल्या प्राथमिक चर्चेत हातकणंगले माजी खासदार राजू शेट्टी यांना सोडण्यावरही चर्चा झाली आहे; तर कोल्हापूर मतदारसंघात काँग्रेसकडे सक्षम उमेदवार असल्याचे सांगत या मतदारसंघावर काँग्रेसनेही दावा सांगितला आहे.

**मुंबई, ठाण्यात ठाकरे गटाला झुकते माप**

मुंबईत शिवसेनेचे तीन खासदार निवडून आले होते; तर ठाणे आणि कल्याण लोकसभाही शिवसेनेने जिंकली होती. या जागा आघाडीत उद्धव ठाकरे यांना द्याव्या लागणार आहेत. असे असले तरी काँग्रेस मुंबईतील दोन आणि भिवंडी मतदारसंघावर दावा करणार असल्याची माहिती काँग्रेसच्या वरिष्ठ सूत्रांनी दिली. मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसला एक जागा मिळू शकते. पालघरच्या जागेबाबत बहुजन विकास आघाडीचे सर्वेसर्वा आमदार हितेंद्र ठाकूर यांच्याशी महाविकास आघाडीचे नेते चर्चा करणार आहेत.

रायगडची जागा पुन्हा एकदा सुनील तटकरे यांना मिळू शकते. मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे हे शिंदे गटात सामील झाल्याने या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस दावा सांगणार असल्याची चर्चा आहे. गेल्यावेळी तेथे अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार यांचा झालेला पराभव अजित पवारांना जिव्हारी लागला होता.

CamScanner

दि. २४/०५/२०२३

पुढारी पु.पा.न.३

# अनधिकृत इमारतीत बनावट कागदपत्रे करून फ्लॅट विक्री

## आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल तपास सुरू

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मकसूद शेख उर्फ मकसूद सायद याने भाईंदर मध्ये अनधिकृत असणाऱ्या इमारतीत बनावट बांधकाम परवानगी व अकृषिक ना हरकत दाखला तयार केला. ते कागदपत्रे दाखवून भाईंदर पूर्वेला राहणाऱ्या ओलीवर लेविस (५५) यांना तो वन बीएचके फ्लॅट २१ लाख रुपयाला १४ फेब्रुवारी २०१३ साली विक्री केला. त्यानंतर अद्यापपर्यंत त्या फ्लॅटचा ताबा दिलेला नाही. त्यामुळे लेविस यांनी न्यायालयात तक्रार केल्यानंतर फसवणूक करणारे बिल्डर मिलिंद सुर्वे, मकसूद शेख उर्फ मकसूद सायद यांच्यावर नवघर पोलीस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिलिंद सुर्वे याच्यावर यापूर्वीही फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत.

भाईंदर पूर्वेला राहणारे लेवीस यांना फ्लॅट विकत घ्यायचा असल्याने त्यांनी त्यांच्या ओळखीचे मकसुद शेख उर्फ मकसुद सायद याला सांगितले. त्यावेळी मकसूद याने प्रथम भाईंदर पूर्वेच्या गोविंद नगरमध्ये वन रूम किचनचा एक फ्लॅट दाखवला त्यानंतर लेवीस यांनी तो फ्लॅट फ्लॅट १२ लाख ५० हजाराला विकत घेतला होता. त्यानंतर साधारण अडीच वर्षानंतर डिसेंबर मकसुद याने सांगितले कि, तुम्हाला दिलेला फ्लॅट हा अनधिकृत असुन तो विकून नविन फ्लॅट घेवुन देतो. त्यानंतर तो फ्लॅट १८ लाख रुपयाला विकला. त्यानंतर जानेवारी २०१३ मध्ये मकसुद याने लेवीस यांना भाईंदर पूर्वेच्या नवघर शिर्डीनगरमधील साई पराग इन्कलेव्ह इमारतीत फ्लॅट दाखवला त्यावेळी त्या इमारतीचे काम चालु होते.

त्या इमारतीत वनबीएचकेच्या फ्लॅटची २१ लाख रुपये किंमत सांगितली. त्यावेळी लेवीस यांनी रूम नं ६०५ बुक केला. त्या इमारतीचे बिल्डर मिलींद सुर्वे, भवानी बिल्डर्स अॅण्ड डेव्हलपर यांना टोकन म्हणून १ लाख रोख स्वरुपात दिले. तसेच स्टॅम्प ड्युटी रजिस्ट्रेशनसाठी दिड लाख रुपये रोख दिले. त्यानंतर ११ फेब्रुवारी २०१३ ला खरेदी दस्तऐवज तयार करण्यात आले होते. त्यावेळी सुर्वे यांच्या नावाने १० लाख रुपये चेक स्वरूपात दिले. त्यानंतर मकसुद याने ४ लाख रुपये रोख व १ लाखाचा चेक दिला होता. या फ्लॅटसाठी एकुण १७ लाख ८० हजार मकसूद शेख उर्फ मकसुद सायद व मिलींद सुर्वे यांना दिले होते. त्यानंतर वेळोवेळी फ्लॅटबाबत विचारणा केली असता टाळाटाळ केली जात होती. त्यानंतर त्यांनी २०१९ पर्यंत फ्लॅट बांधून दिला नाही म्हणून लेवीस यांनी न्यायालयात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर जानेवारी २०१३ पासून ते अद्याप पर्यंत त्यांनी फ्लॅट दिला नाही तसेच घेतलेले पैसे देखील परत दिले नाही.

ही इमारत अनधिकृत असल्याची माहिती मिळाली व दिलेले कागदपत्र देखील खोटे असल्याची माहिती उघडकीस आली. त्यामुळे त्या दोघांनी विश्वासघात करून फसवणुक केल्याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात भादंवि कलम विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या फसवणूकीच्या प्रकाराने भाईंदर परिसरात खळबळ उडाली आहे.

सकाळ पु.पा.न.३

# रिक्षात विसरलेले सोन्याचे दागिने परत

**भाईंदर, ता. २३ (बातमीदार) :** काशी-मिरा येथून रिक्षाने बोरीवलीला जाणारे कुटुंब सामानाची बॅग रिक्षातच विसरले होते. या बॅगेत तब्बल २१ तोळे सोन्याचे दागिने होते. काशी-मिरा पोलिसांनी तत्परतेने हालचाल करून रिक्षाचालकाला अवघ्या पाच तासांत शोधून काढले आणि रिक्षात विसरलेले दागिने कुटुंबाला परत केले.



**भाईंदर :** सोन्याचे दागिने काशी-मिरा पोलिसांनी पाच तासांत शोधून परत केले.

काशी-मिरा येथील माशाचा पाडा परिसरात राहणारे कुटुंब रिक्षेने बोरीवलीला जात होते. सामानाची एक बॅग त्यांनी रिक्षाच्या सीटच्या मागच्या भागात ठेवली. त्या बॅगेमध्ये सुमारे १२ लाखांचे सोन्याचे दागिने होते. बोरीवलीला रिक्षातून उतरल्यावर पाठीमागे ठेवलेली बॅग काढण्याचे ते विसरून गेले व रिक्षा निघून गेली. रिक्षा गेल्यानंतर बॅग रिक्षातच विसरल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी परत काशी-मिरा गाठत पोलिस ठाण्यात दागिने गहाळ झाल्याची तक्रार दाखल केली. पोलिसांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासत रिक्षा शोधून काढत दागिने ताब्यात घेतले.

CS CamScanner

दि २४/०५/२०२३

सकाळ पा.न. ९



**ठाणे :** आई-वडिलांसोबत आनंद व्यक्त करताना कश्मिरा संखे.

## इशिता किशोर देशात पहिली | ठाण्याची कश्मिरा राज्यात प्रथम

# 'यूपीएससी'त महिलाराज

**सकाळ न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली, ता. २३ : केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) घेतलेल्या सनदी सेवेच्या मुख्य परीक्षा २०२२ चा निकाल आज घोषित केला असून त्यात सलग दुसऱ्या वर्षी युवतींनी पहिल्या तीनमध्ये स्थान कायम राखले आहे. दिल्लीच्या लेडी श्रीराम कॉलेजची विद्यार्थिनी इशिता किशोर हिने प्रतिष्ठेच्या परीक्षेत देशात अव्वल स्थान पटकाविले आहे. ठाण्यातील डॉ. कश्मिरा संखे महाराष्ट्रातून पहिली आली आहे. एकूण गुणवत्ता यादीत ती २५व्या स्थानी आहे.

'यूपीएससी'ने ९३३ जणांची गुणवत्ता यादी जाहीर केली. निवड झालेल्या उमेदवारांची 'आयएएस', 'आयएफएस', 'आयपीएस' व इतर सेवांमध्ये नियुक्ती केली जाते. या परीक्षेत दुसऱ्या स्थानी गरिमा लोहिया, तर तिसऱ्या स्थानी उमा हरित एन. हिने स्थान पटकाविले आहे. चौथा क्रमांक स्मृती मिश्रा हिने मिळवला.

मुलांमध्ये पहिला आलेला मयूर हजारिका गुणवत्ता यादीत पाचव्या स्थानी आहे. म्हणजे पहिल्या पाच क्रमांकांत चार मुली आहेत. उत्तीर्णांमध्ये ३४५ उमेदवार खुल्या प्रवर्गातील आहेत. ९९ जण आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील, २६३ ओबीसी, १५४ अनुसूचित जाती व ७२ अनुसूचित जमाती प्रवर्गातील आहेत. इशिता किशोर अर्थशास्त्रातील पदवीधर आहे.

> परीक्षेच्या तयारीसाठी मी खूप आधीपासूनच दररोज वर्तमानपत्र वाचत होते. ते मी कटाक्षाने पाळले. २०१८मध्ये बीडीएसची पदवी घेतली. त्यानंतर २०१९मध्ये इंटर्नशिप केली आणि त्यानंतर नागरी सेवा परीक्षेचा अभ्यास खऱ्या अर्थाने सुरू केला.
>
> **- डॉ. कश्मिरा संखे**

### महाराष्ट्रातील २० जण

'यूपीएससी'च्या गुणवत्ता यादीत महाराष्ट्रातील २० उमेदवारांनी स्थान पटकाविले आहे. गुणवत्ता यादीत २५ व्या क्रमांकावर आलेली डॉ. कश्मिरा संखे हिने महाराष्ट्रातून पहिले स्थान पटकाविले आहे.

**» महाराष्ट्रातील उमेदवार : पान १०**
**» नागरी सेवेचा निर्धार : पान ५**

सकाळ पु.पा.न. ३

## नायगाव पुलासाठी हितेंद्र ठाकूर यांना साकडे

**विरार (बातमीदार) :** नायगाव स्थानकाच्या पूर्वेकडील पुलाचे काम अनेक महिन्यांपासून रखडले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर यांची भेट घेऊन या पुलाचे काम लवकर पूर्ण करण्यासाठी साकडे घातले. तसेच त्यांनी वाकी पाडा येथील पाझर तलावावरील जाण्याचा रस्त्याच्या अपूर्ण कामाबद्दल निवेदन देऊन चर्चा केली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने आमदार हितेंद्र ठाकूर यांची नुकतीच भेट घेतली. नायगाव पूर्व येथील स्थानकावर जाणाऱ्या पुलाच्या अपूर्ण कामाबद्दल, तसेच नायगाव पूर्व वाकी पाडा येथील पाझर तलावावरील जाण्याचा रस्त्याच्या अपूर्ण कामाबद्दल चर्चा केली. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्ष मेघा म्हात्रे, जिल्हा सचिव मनोज म्हात्रे, वसई विरार तालुका उपाध्यक्ष नितीन म्हात्रे, देवेंद्र शिरोडकर, प्रेमलाल यादव, अमर पाटील, भरत म्हात्रे आदी उपस्थित होते.

CamScanner

दि. २8/04/2023

सकाळ पु.पा. नं. 3

# बेकायदा पार्किंगची समस्या गंभीर

## वसई, विरारमधील अवजड वाहनांवर कारवाईची मागणी

विरार, ता. २३ (बातमीदार) : मुंबई-अहमदाबाद महामार्गाला जोडणाऱ्या मधुबन ते सातिवली या रस्त्याच्या बाजूला मोठ्या प्रमाणात बेकायदा वाहन उभी करण्यात येत आहे. या रस्त्यावर अनेक अवजड वाहने उभी असतात. हे चालक रस्त्यावरील वाहतूक कोंडीची कुठलीही तमा न बाळगता सर्रासपणे अवजड वाहने रस्त्याशेजारी लावून वाहतूक विस्कळित करत आहेत. त्यामुळे या वाहनचालकांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.



**विरार :** अवजड वाहनांमुळे शहरातील वाहतूक कोंडीत भर पडत आहे.

### चालकांवर गुन्हे दाखल करावेत!

रस्त्याशेजारी बेकायदा ठिकाणी वाहने उभी करण्यात येत आहेत. शहरातील वाहनचालकांवर गुन्हे दाखल केल्यास ही समस्या सुटेल. त्यामुळे चालकांवर गुन्हे दखल दाखल करण्यात यावेत, अशी मागणी अतुल मोटे यांच्यासह शिवसेनेचे वसई पूर्वेतील नेते अजित वैती, तसेच माजी पंचायत समिती सदस्य काका मोटे आणि विभागप्रमुख विश्वास किणी यांनी केली आहे.

रस्त्यावर वाहने उभी करून वाहतूक कोंडी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

**- सागर इंगोले**, पोलिस निरीक्षक, वाहतूक विभाग

वसई पूर्वेत दिवसेंदिवस वाहतूक कोंडीची समस्या अधिकच होत आहे. यावर तातडीने उपाययोजना करून अशा बेकायदा वाहन पार्किंग करणाऱ्यांवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात यावेत, यासाठी युवासेनेचे अतुल काकासाहेब मोटे यांनी वाहतूक विभागाचे पोलिस निरीक्षक सागर इंगोले यांची नुकतीच भेट घेऊन चर्चा केली आहे. रेंज ऑफिस ते भोईदापाडा या ठिकाणी मोठ्या प्रमाणात बेकायदा वाहने उभी करण्यात येत आहेत. ही वाहने रस्त्यावर मनमानी पद्धतीने उभी करण्यात येत आहेत. त्यामुळे शहरातील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस वाढत आहे. सकाळी आणि संध्याकाळी मोठ्या प्रमाणात कोंडी होते. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होते.

वसई पूर्व परिसर हा औद्योगिक वसाहतीने घेरलेला आहे. त्यामुळे संध्याकाळच्या सुमारास मोठ्या प्रमाणात वाहनांची आणि नागरिकांची वर्दळ असते. या वर्दळीच्या वेळी अवजड वाहनांची वाहतूक करणारे व्यावसायिक सर्व नियमांचे उल्लंघन करून सर्रासपणे वाहने रस्त्यावर उभी करत आहेत. त्यामुळे संध्याकाळच्या वेळी सुमारे एक ते दीड तास वाहतूक कोंडी निर्माण होते. ही कोंडी सुरळीत करण्यासाठी वाहतूक पोलिसांवर देखील मोठ्या प्रमाणात ताण येत असल्याचे शिवसेनेचे नेते काकासाहेब मोटे आणि विभागप्रमुख विश्वास किणी यांनी म्हटले आहे.

पुण्य नगरी पु.पा.न. 9

# गांजा विक्री करणाऱ्यांना अटक

**मीरा रोड :** काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत गांजा विक्री करण्यासाठी आलेल्या तिघांना काशिमीरा पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने अटक केली. त्यांच्याकडून ४२ किलो गांजा व एक रिक्षा असा ४ लाख ७० हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

काशिमीरा परिसरात काहीजण गांजा विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती काशिमीरा पोलिसांना मिळाली. माहिती मिळाल्यानंतर वपोनि. कदम यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाला कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोनि. कुमारगौरव धादवड (गुन्हे) व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि. प्रशांत गांगुर्डे यांनी पथकासह घोडबंदर रोडवरील वरसावे गावच्या हद्दीत जुना बंद टोलनाक्याजवळ सापळा लावून अभिषेक देविदास वाघ (२५), अभिषेक जसवंत सिंग (२०), कुलदीप गुरनाम सिंग ([illegible]) हे तिघे रिक्षातून आले असता, त्या तिघांना रिक्षासह ताब्यात घेतले. रिक्षाची झडती घेतली असता रिक्षामध्ये चार प्लास्टिकच्या गोण्या मिळून आल्या. त्या गोण्यांची तपासणी केली असता, त्यामध्ये ४,२०,००० रुपये किमतीचा ४२ किलो गांजा मिळून आला. या आरोपींकडे चौकशी केली असता, त्यांनी हा गांजा ओरिसा राज्यातून विक्रीसाठी आणल्याचे सांगितले. आरोपींकडून ४२ किलो गांजा तसेच गुन्ह्यात वापरलेली रिक्षा असे मिळून ४,७०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या आरोपी विरुद्ध काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक केलेले आरोपी हे सध्या पोलीस कोठडीत आहेत.

CamScanner

दि. 28/05/2023

पुण्य नगरी पा.नं. 3

# राहुल गांधींची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांशी केल्याबद्दल काँग्रेसने देशाची माफी मागावी

## भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची मागणी

**। मुंबई** : राहुल गांधींची तुलना छत्रपती शिवाजी महाराजांशी केल्याबद्दल काँग्रेसने तातडीने देशाची माफी मागावी, अन्यथा आंदोलन करू, असा इशारा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी दिला. नवाब मलिक यांच्या अटकेबाबत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी महाराष्ट्राची दिशाभूल करू नये, असेही बावनकुळे म्हणाले.

भाजप प्रदेश कार्यालयात ते पत्रकारांशी बोलत होते. भाजप प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी, चैनसुख संचेती यावेळी उपस्थित होते. बावनकुळे म्हणाले, काँग्रेस पक्षाकडून प्रसारित केल्या गेलेल्या एका व्हिडीओमध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी यांची छत्रपती शिवाजी महाराज यांच्याशी तुलना करण्यात आली आहे. या प्रकाराबद्दल काँग्रेसने तातडीने देशाची माफी मागावी, अन्यथा भाजप याविरोधात आंदोलन करेल.



मुंबईत बॉम्बस्फोट घडवणाऱ्या देशद्रोही दाऊद इब्राहिम टोळीशी संबंध असल्याच्या आरोपावरून राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक यांना अटक करण्यात आली आहे. समीर वानखेडे यांच्यावर केलेल्या आरोपांचा आणि नवाब मलिक यांच्या अटकेचा काहीच संबंध नाही. मात्र शरद पवार यांना जनतेची दिशाभूल करण्याची सवय आहे. या सवयीतूनच पवार यांनी नवाब मलिक यांच्या अटकेबाबत चुकीची माहिती दिली आहे. पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याने जनतेत या पद्धतीने संभ्रम पसरवू नये, असे ते म्हणाले.

माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांना न्यायालयाने प्रकृतीच्या कारणास्तव जामीन मंजूर केला आहे. देशमुखांवरील आरोपांची सुनावणी न्यायालयात अजून सुरू असताना खुद्द अनिल देशमुख न्यायालयाबाबत मतप्रदर्शन करीत असल्याने न्यायालयाचा अवमान होत आहे. देशमुख यांनी याबाबत जाहीर वक्तव्ये न थांबवल्यास न्यायालयाकडे त्यांची तक्रार करू, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

### अजित पवारांची मविआकडूनच बदनामी

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भाजपने प्रवेशाचे निमंत्रण दिलेले नाही. पवार यांनीही भाजपमध्ये येण्याची इच्छा व्यक्त केलेली नाही. असे असताना पवार राष्ट्रवादी सोडणार असल्याच्या बातम्या वारंवार पसरवल्या जात आहेत. महाविकास आघाडीच्या नेत्यांकडूनच पवार यांची बदनामी केली जात आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले.

पुण्य नगरी पु.पा.नं. 1

# पालिका कामगारांच्या मागण्यांसाठी पालिकेवर गुरुवारी मोर्चा

**। वसई** : वसई-विरार महानगरपालिकेच्या मुख्यालयावर कामगारांच्या विविध मागण्यांसाठी पालिका अंतर्गत ठेका कर्मचाऱ्यांचे अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाचे २५ मे रोजी मोर्चाचे आयोजन केले आहे. शासन नियमाप्रमाणे कर्मचाऱ्यांना समान काम समान वेतन मिळावे. वर्षानुवर्षे महानगरपालिकेला सेवा पुरवणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायमस्वरूपी रुजू करून घेण्यात यावे. शासकीय भूखंडामधून कर्मचाऱ्यांना मोफत घरे देण्यात यावी. कर्मचाऱ्यांना गणवेश, बूट, चपला, हातमोजे, व पावसाळी गणवेश तसेच सेफ्टी किट योग्य त्या वेळेत मिळावे, कर्मचाऱ्यांचा सुट्टीचा पगार हा पूर्ण स्वरूपात व योग्य त्या वेळेत देण्यात यावा. शासन नियमांप्रमाणे कर्मचाऱ्यांना हात-पाय धुण्यासाठी व जेवणासाठी कँटीन सुविधा उपलब्ध करण्यात यावी. कर्मचाऱ्यांना योग्य ते वार्षिक हाफ डे ठरवून तशी यादी सर्व ठेकेदारांच्या कार्यालयामध्ये लावण्यात यावी. अशा अनेक मागण्या घेऊन हा मोर्चा काढण्यात येणार असल्याचे अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाचे उपाध्यक्ष विजय मांडवकर यांनी सांगितले.

CamScanner

दि.२४/०५/2023

पुण्य नगरी पु.पा.नं. ४

# अनधिकृत पार्किंग करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करा

## ▌युवासेनेचे वाहतूक पोलिसांना साकडे



**। नालासोपारा :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या मधुबन ते सातीवली रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वाहन पार्किंग करण्यात येत असून, या रस्त्यावर अनेक मोठे ट्रान्सपोर्ट आहेत. हे ट्रान्सपोर्ट व्यावसायिक रस्त्यावरील वाहतूक कोंडीची कुठलीही तमा न बाळगता सर्रास १० चाकी वाहने रस्त्यावर लावून वाहतूक विस्कळीत करतात. त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून, आता बेकायदेशीररित्या रस्त्यावर अवाढव्य स्वरूपाची वाहने उभी करणाऱ्या या वाहनांवर आणि ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांवर कारवाई करण्याची मागणी युवासेनेचे अतुल काकासाहेब मोटे यांनी वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक सागर इंगोले यांच्याकडे केली आहे.

वसई पूर्व परिसर हा औद्योगिक वसाहतीचा असल्याने संध्याकाळच्या सुमारास मोठ्या प्रमाणात वाहनांची आणि नागरिकांची वर्दळ असते. या वर्दळीच्या वेळी हे ट्रान्सपोर्ट व्यावसायिक शासनाच्या सर्व नियमांना बगल देत वाहने रस्त्यावर उभी करत आहेत. त्यामुळे संध्याकाळच्या वेळी सुमारे एक ते दीड तास मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत असून, ही वाहतूक कोंडी सुरळीत करण्यासाठी वाहतूक पोलिसांवरदेखील मोठ्या प्रमाणात ताण येत असल्याचे शिवसेनेचे नेते काकासाहेब मोटे आणि विभागप्रमुख विश्वास किणी यांचे म्हणणे आहे. सातत्याने त्यांच्यावर कारवाई करूनदेखील जाणीवपूर्वक पुन्हा वाहने रस्त्यावर उभी करत असल्याने आता या वाहनांवर तसेच ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांवर नागरिकांना आणि प्रशासनाला सातत्याने जाणीवपूर्वक त्रास देण्यात येत असल्याने तातडीने कारवाई करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी आग्रही मागणी अतुल मोटे यांच्यासह शिवसेनेचे वसई पूर्वतील नेते अजित वैती तसेच माजी पंचायत समिती सदस्य काकासाहेब मोटे आणि विभागप्रमुख विश्वास किणी यांनी केली आहे. रस्त्यावर वाहने उभी करून वाहतूक कोंडी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची प्रतिक्रिया वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक सागर इंगोले यांनी दिली आहे.

CamScanner